आजचा सुविचार
वेळ, सत्ता, संपत्ती आणि शरीर
साथ देवो न देवो,
परंतु चांगला स्वभाव आणि चांगले संबंध
कायम आयुष्यभर साथ देतात.

# दैनिक अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २१५, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.१८ मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# एकनाथ शिंदे दिल्लीला रवाना, पंतप्रधान मोदींना भेटणार

## भाजप-शिवसेनेतील कुरबुरींबाबत तक्रारीची शक्यता

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, मुंबई :** शिवसेनेचे नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सोमवारी दिल्लीला रवाना झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ते भेट घेणार असल्याचे समजते. या भेटीमागचे कारण गुलदस्त्यात असले तरी आणि दौऱ्याबाबत कोणतीही अधिकृत माहिती नसली तरीही राज्यातील भाजप आणि शिवसेना यांच्यात सुरू असलेली कुरबुर या भेटीमागे असल्याचे बोलले जात आहे.



**शिंदे–मोदी भेट !**

सोमवारी सायंकाळी एकनाथ शिंदे दिल्लीला रवाना झाले. सोमवारी त्यांचा दिल्लीत मुक्काम असून या दौऱ्यादरम्यान ते पंतप्रधानांची भेट घेणार असल्याचे कळते. दरम्यान, महापालिका निवडणुकीमध्ये भाजप आणि शिवसेनेला चांगले यश मिळाले. काही ठिकाणी शिवसेनेचा महापौर झाला तर काही ठिकाणी भाजपचा महापौर झाला. मात्र त्यानंतर जिल्हा परिषद निवडणुका झाल्या. या निवडणुकांमध्येही भाजप हा क्रमांक एकचा पक्ष ठरला तर, शिवसेनालाही चांगले यश मिळाले. या निवडणुकीतही अनेक ठिकाणी भाजप शिवसेना यांची युती होती. मात्र निकालानंतर त्यांना सत्तेपासून दूर ठेवले जात असल्याचा आरोप करण्यात आला.

**शिवसेना–भाजप कुरबुरी...**

त्यानंतर जिल्हा परिषद निवडणुकीमध्येही अनेक ठिकाणी शिवसेनेला सत्तेपासून दूर ठेवले जात असल्याचा तसेच, दुजाभाव केला जात असल्याचा आरोप शिवसेनेकडून करण्यात आला. रायगडमध्ये बहुमत असूनही शिवसेनेला तडजोड करावी लागली तर, फलटणमध्ये शिवसेनेला सत्तेपासून दूर ठेवण्यात आल्याची खंत स्थानिक शिवसैनिकांकडून व्यक्त केली जात आहे. रायगडसंदर्भात वर्षा बंगल्यावर एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुनील तटकरे यांच्यात हमरीतुमरी झाल्याचे समजते. त्यामुळे यावर काही ठोस तोडगा निघावा, यासाठी शिंदे हे अचानक दिल्लीला गेल्याचे समजते.

**केडीएमसीचे सभागृह नेतेपद भाजपला...**

मागील दोन महिन्यापासून रखडलेली कल्याण डोंबिवली महापालिकेची महासभा अखेर सोमवारी घेण्यात आली. अपेक्षेप्रमाणे सभागृह नेतेपद भाजपच्या वाट्याला आले असून भाजपचे नगरसेवक वरुण पाटील यांची निवड करण्यात आल्याची घोषणा महापौर हर्षाली थविल यांनी केली. पहिल्याच स्थायी समितीवर दिग्गजांची वर्णी लागली आहे.

महापालिकेत शिवसेना, भाजप आणि मनसेची सत्ता असून शिवसेना ठाकरे गट विरोधी बाकांवर बसला आहे. संख्याबळानुसार शिव आघाडीच्या वाट्याला आठ, भाजपला सात, तर ठाकरे गटाला एक अशा १६ सदस्यांची स्थायी समितीवर निवड करण्यात आली आहे.

यात शीव आघाडीकडून गजानन पाटील, विकास म्हात्रे, जयवंत भोईर, मल्लेश शेट्टी, नवीन गवळी, महेश गायकवाड, विजया पोटे यांच्यासह मनसेच्या गणेश लांडगे यांची, भाजपकडून दिपेश म्हात्रे, मंदार हळबे, दया गायकवाड, मनीषा गायकवाड, उपेक्षा भोईर, मुकुंद पेडणेकर आणि नंदू म्हात्रे यांची तर ठाकरे गटाकडून विशाल गारवे यांची निवड करण्यात आली.

दिग्गजांची फौज स्थायी समितीत रुजू झाल्याने सभापतिपदासाठी रस्सीखेच रंगणार आहे. महायुतीत वाद नसल्याचा दावा भाजपने केल्याने हे पद भाजपला मिळणार का, याकडे लक्ष लागले आहे.

# ड्रग्सविरोधात 'झिरो टॉलरन्स' धोरण राबविणार - मुख्यमंत्री फडणवीस

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, मुंबई :** नागपूर शहरातील मोतीबाग परिसरात ड्रग्स तस्करांविरोधात झालेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर राज्य शासन अमली पदार्थांविरोधात 'झिरो टॉलरन्स' धोरण राबविणार आहे. अशा गुन्ह्यांमध्ये सहभागी आरोपींची संपत्ती जप्त करण्यासह कठोर कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

मोतीबाग येथील ड्रग्स तस्करांच्या घरांवर छापे टाकून गांजा व अग्निशस्त्रांचा साठा जप्त करण्यात आल्याबाबत सदस्य प्रवीण दटके यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या चर्चेत विकास ठाकरे, विक्रम पाचपुते आणि डॉ. नितीन राऊत यांनी सहभाग घेतला.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, संबंधित प्रकरणात सामाजिक गुन्हेगारी नियंत्रण कायदा, १९९९ अंतर्गत विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींविरुद्ध चार्जशीट दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, पुढील टप्प्यात कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्यांच्या मालमत्तेवर जप्तीची कारवाई केली जाणार आहे.

बेकायदेशीर बांधकाम आढळल्यास सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार नोटीस देऊन महानगरपालिकेमार्फत योग्य ती कारवाई केली जाईल. तसेच संबंधित भागात विशेष मोहीम राबवून अशा गुन्ह्यांना आळा घालण्यात येईल. भविष्यात अशा घटना घडल्यास संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनाही जबाबदार धरण्यात येईल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

नागपूर पोलिसांनी 'ऑपरेशन थंडर' अंतर्गत मोठ्या प्रमाणावर कारवाया करत गेल्या ११ महिन्यांत ९०७ गुन्हे उघडकीस आणले आहेत. या कारवायांमध्ये सुमारे १२५४ किलो अमली पदार्थ जप्त करण्यात आले असून त्यांची किंमत अंदाजे १० कोटी रुपये आहे. राज्यात ड्रग्सविरोधी कारवाई अधिक प्रभावी करण्यासाठी ३१ ऑगस्ट २०२३ रोजी अँटी नारकोटिक टास्क फोर्स (अछढऋ) स्थापन करण्यात आली आहे. ही यंत्रणा राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांपर्यंत विस्तारण्यात आली असून नवीन पदनिर्मितीद्वारे ती अधिक बळकट करण्यात आली आहे. केंद्र शासन व इतर राज्यांशी समन्वय वाढवून इंटेलिजन्स शेअरिंग केल्यामुळे आंतरराज्य व आंतरराष्ट्रीय ड्रग्स नेटवर्कवर कारवाई शक्य होत असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस नमूद केले.

ड्रग्स प्रकरणांमध्ये केवळ गुन्हा नोंदवून थांबणार नसून 'फॉरवर्ड' आणि 'बॅकवर्ड' लिंक शोधून संपूर्ण साखळी उद्ध्वस्त करण्यावर भर दिला जात आहे. तसेच अशा गुन्ह्यांमध्ये थेट किंवा अप्रत्यक्ष सहभाग आढळणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर निलंबनाऐवजी थेट बडतर्फीची कारवाई केली जाईल. अल्पवयीन मुलांचा ड्रग्स तस्करीत वापर होत असल्याची बाब गंभीर असल्याचे नमूद करत, अशा गुन्ह्यांसाठी कायदेशीर वयोमर्यादा १८ वरून १६ वर्षे करण्याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार असल्याची माहितीही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली

# अल्पवयीन मतीमंद मुलीवर नातेवाईकांकडूनच अत्याचार, नराधमांना अटक

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, पुणे :** विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे शहरात नात्यांना काळिमा फासणारी एक अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. एका सुरक्षित समजल्या जाणाऱ्या उच्चभ्रू सोसायटीत राहणाऱ्या अल्पवयीन आणि मतिमंद मुलीवर तिच्याच तीन नातेवाईकांनी गेल्या सहा–सात महिन्यांपासून सामूहिक अत्याचार केल्याचे उघड झाले आहे. या घटनेमुळे परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, भारती विद्यापीठ पोलिसांनी तिन्ही आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत.




**विश्वासाचा घात**

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी अल्पवयीन असून तिची मानसिक स्थिती सामान्य नाही. या गोष्टीचा फायदा घेत तिच्याच जवळच्या नात्यातील तीन व्यक्तींनी तिला आपल्या जाळ्यात ओढले. घराशेजारीच राहणारे आणि ओळखीचे असल्याने या नराधमांना मुलीच्या घरात येण्या–जाण्यास कोणाचीही आडकाठी नव्हती. मात्र, याच ओळखीचा गैरफायदा घेत आरोपींनी सोसायटीच्या क्लब हाऊसच्या स्वच्छतागृहात आणि इतर वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन तिच्यावर वारंवार अत्याचार केला.

**पीडितेने मांडली आपबिती**

गेल्या सहा ते सात महिन्यांपासून हा अघोरी प्रकार सुरू होता.

सततच्या अत्याचारामुळे पीडित मुलीच्या स्वभावात आणि वागण्यात अचानक बदल झाला होता. ती भेदरलेल्या अवस्थेत राहू लागल्याने कुटुंबीयांच्या मनात शंका आली. पालकांनी तिला विश्वासात घेऊन विचारपूस केली असता, तिने आपल्यासोबत घडलेला सर्व धक्कादायक प्रकार सांगितला. ज्या नातेवाईकांना कुटुंब आपले समजत होते, त्यांनीच मुलीचे आयुष्य उद्ध्वस्त केल्याचे समोर येताच पालकांच्या पायाखालची जमीन सरकली.

**पोलिसांकडून तात्काळ कारवाई**

मुलीने आपबिती सांगताच कुटुंबीयांनी विलंब न करता भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तातडीने तपास चक्र फिरवली आणि तिन्ही नराधम नातेवाईकांना ताब्यात घेतले. आरोपींवर बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना उघडकीस आल्यानंतर समाजात संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. स्वतःच्या घरात आणि नातेवाईकांकडेही जर मुली सुरक्षित नसतील, तर विश्वास कोणावर ठेवायचा? असा गंभीर प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

# वाढत्या उष्मालाटेचा मुकाबला करण्यासाठी जिल्हा प्रशासनाची सज्जता

**दि.१७, मुंबई :** राज्यात दरवर्षी उन्हाचा पारा वाढत आहे. उष्णतेच्या लाटेमुळे केवळ अस्वस्थता येत नाही, तर ती जीवघेणीही ठरू शकते. ही गंभीर परिस्थिती लक्षात घेता, प्रशासकीय विभाग, महानगरपालिका, आरोग्य यंत्रणा आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने एकत्रितपणे राबवायच्या उपाययोजनांचा हा 'ॲक्शन प्लॅन'.

**१. नागरी सुविधा : सावली आणि पाणी हाच आधार**

महानगरपालिका आणि नगरपालिकांनी सार्वजनिक ठिकाणी (बस स्टँड, बाजार, रिक्षा स्टँड) तात्पुरत्या शेडची व्यवस्था करावी. 'वॉटर एटीएम' किंवा पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून द्यावी. शॉपिंग मॉल्सनी केवळ ग्राहकांसाठीच नव्हे, तर सर्वसामान्यांसाठीही थंड पाण्याची सुविधा उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. दुपारी १२ ते ४ या वेळेत शहरातील उद्याने खुली ठेवून नागरिकांना विसावा घेण्याची संधी द्यावी.

**२. आरोग्य यंत्रणा : 'गोल्डन अवर'मध्ये उपचार**

स्वतंत्र वॉर्ड : प्रत्येक रुग्णालयात उष्माघाताच्या रुग्णांसाठी वातानुकूलित किंवा थंड वॉर्ड असावेत.

जलद प्रतिसाद टीम : उष्माघाताची लक्षणे दिसताच तात्काळ उपचार करण्यासाठी विशेष पथके तैनात असावीत.

असुरक्षित गट : लहान मुले, वृद्ध, गरोदर महिला आणि मजुरांकडे विशेष लक्ष देण्यासाठी आशा वर्कर व अंगणवाडी सेविकांनी घरोघरी जाऊन जनजागृती करावी.

**३. शिक्षण आणि कामगार : वेळापत्रकात बदल अनिवार्य**

शाळा : उन्हाची तीव्रता पाहता शाळा सकाळच्या सत्रात भराव्यात किंवा आवश्यकतेनुसार सुट्ट्या जाहीर कराव्यात. मैदानावरील खेळ दुपारी टाळावेत. माध्यान्ह भोजनात ताक किंवा ओआरएस यांचा समावेश करावा.

मजूर : 'मनरेगा' आणि बांधकामावरील मजुरांच्या कामाच्या वेळा बदलाव्यात. कामाच्या ठिकाणी छप्पर आणि थंड पाणी असणे मालकाची जबाबदारी असेल. मजुरांना 'सीपीआर' चे प्राथमिक प्रशिक्षण द्यावे.

**४. प्राणी आणि पर्यावरण : निसर्गाचीही काळजी**

वन विभागाने वन्यप्राण्यांसाठी जंगलात पाणवठे तयार करावेत. पशुधन विभागाने जनावरांच्या गोठ्यात थंड पाण्याची आणि हिरव्या चाऱ्याची सोय करण्यासाठी पशुपालकांना मार्गदर्शन करावे.

**५. पोलीस आणि वाहतूक विभाग**

ट्रॅफिक सिग्नलवर कर्तव्य बजावणाऱ्या पोलिसांसाठी छत्री किंवा बूथची सोय करावी. सर्व सार्वजनिक बसमध्ये प्रथमोपचार पेटी आणि ओआरएस पाकीट उपलब्ध असावेत.

**उष्मालाटेपासून बचावासाठी 'हे' नक्की करा (मार्गदर्शक सूचना)**

*** काय करावे?**

भरपूर पाणी प्या : तहान लागलेली नसली तरीही दिवसातून वारंवार पुरेसे पाणी प्यावे. शरीरातील पाण्याचे प्रमाण टिकवून ठेवणे हा उष्माघातापासून वाचण्याचा सर्वोत्तम उपाय आहे.

सोबत पाणी ठेवा : प्रवासादरम्यान किंवा बाहेर पडताना पाण्याची बाटली नेहमी सोबत ठेवा.

नैसर्गिक पेयांचे सेवन करा : आहारात लिंबू पाणी, ताक, लस्सी, फळांचा रस आणि नारळ पाणी यांसारख्या घरगुती पेयांचा समावेश करा.

ओआरएस वापरा : शरीरातील क्षारांचे प्रमाण कमी होऊ नये म्हणून ओआरएस द्रावणाचा वापर करा.

पाणीदार फळे आणि भाज्या खा : टरबूज, खरबूज, संत्री, द्राक्षे, अननस, काकडी आणि कोशिंबीर यांसारख्या जास्त पाणी असलेल्या हंगामी फळांचे व भाज्यांचे सेवन करा.

योग्य कपड्यांची निवड : बाहेर जाताना पातळ, सैल आणि हलक्या रंगाचे सुती कपडे वापरावेत.

डोके आणि शरीर झाकून ठेवा : थेट सूर्यप्रकाश टाळण्यासाठी बाहेर पडताना छत्री, टोपी, टॉवेल किंवा दुपट्ट्याचा वापर करा. डोके झाकून ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

पादत्राणे वापरा : कडक उन्हात अनवाणी फिरू नका, बाहेर जाताना नेहमी बूट किंवा चपलांचा वापर करा.

हवामानाची माहिती घ्या : रेडिओ, टीव्ही, वृत्तपत्रे किंवा भारतीय हवामान विभागाच्या संकेतस्थळावरून उष्णतेच्या लाटेबाबतच्या सूचना आणि अपडेट्स नियमितपणे पाहत राहा.

थंड ठिकाणी राहा : दिवसा शक्यतो हवेशीर आणि थंड ठिकाणी राहण्याचा प्रयत्न करा. खिडक्यांना पडदे लावा आणि रात्री थंड हवा येण्यासाठी खिडक्या उघड्या ठेवा.

कामाचे नियोजन : घराबाहेरची कष्टाची कामे शक्यतो सकाळी लवकर किंवा संध्याकाळी उशिरा, जेव्हा तापमान कमी असते, तेव्हा पूर्ण करा.

*** काय करू नये?**

भर उन्हात फिरणे टाळा : विशेषतः दुपारी १२:०० ते ३:०० या कालावधीत, जेव्हा उष्णता सर्वाधिक असते, तेव्हा घराबाहेर पडणे टाळावे.

कठोर शारीरिक श्रम टाळा : दुपारच्या वेळी बाहेर असताना ओझे उचलणे किंवा कष्टाची शारीरिक कामे करू नका.

विशिष्ट पेयांचे सेवन टाळा : अल्कोहोल (मद्य), चहा, कॉफी आणि मोठ्या प्रमाणात साखर असलेली कार्बोनेटेड सॉफ्ट ड्रिंक्स पिणे टाळा, कारण यामुळे शरीरातील पाणी वेगाने कमी होते.

चुकीचा आहार टाळा : जास्त प्रथिने असलेले अन्न (उदा. मांसाहार) आणि शिळे अन्न खाणे टाळावे.

उन्हात स्वयंपाक टाळा : घरामध्ये हवा खेळती नसल्यास अति उष्णतेच्या वेळी (दुपारी) स्वयंपाक करणे टाळा. स्वयंपाकघराचे दरवाजे आणि खिडक्या उघड्या ठेवा.

वाहनांमध्ये कोणालाही सोडू नका : उभ्या असलेल्या किंवा पार्क केलेल्या वाहनांमध्ये लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना एकटे सोडू नका. बंद गाडीतील तापमान काही मिनिटांतच जीवघेणे ठरू शकते.

अंधाधुंद श्रम नको : जर तुम्ही थंड प्रदेशातून उष्ण ठिकाणी आला असाल, तर तुमच्या शरीराला तिथल्या तापमानाशी जुळवून घेण्यासाठी किमान एक आठवडा द्या; लगेच जास्त श्रम करू नका.

**प्रशासकीय समन्वय आणि आपत्ती व्यवस्थापन..**

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने (ऊचअ) प्रत्येक तालुक्यात 'नोडल अधिकारी' नियुक्त करून दैनंदिन अहवाल घ्यावा. स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने गरजूंपर्यंत छत्री आणि पादत्राणे पोहोचवावीत. समाजमाध्यमांचा वापर करून नागरिकांना हवामानाचे नियमित अपडेट्स द्यावेत. सावध राहा, सुरक्षित राहा! उन्हाच्या झळांपासून स्वतःचा आणि इतरांचा बचाव करणे, ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.




## बॉर्न गिफ्ट आणि सामाजिक जबाबदारी

डॉ. मेधा पूरव-सामंत या सोलापूरमध्ये महिला दिनाच्या कार्यक्रमानिमित्त आल्या होत्या. त्यांनी या कार्यक्रमात आपल्या अन्नपूर्णा परिवाराच्या कार्याची माहिती दिली. पुणे आणि मुंबई शहरांतील उपेक्षित,वंचित महिलांच्या कल्याणासाठी त्यांनी बँकिंगच्या माध्यमातून फार मोठे काम उभे केले आहे. 'अन्नपूर्णा परिवार' ही संस्था गरीब आणि गरजू महिलांच्या सक्षमीकरणाविषयी समग्र विचार करते. अन्नपूर्णा परिवाराच्या संस्थापक आणि मुख्य व्यवस्थापकीय संचालक डॉ. मेधा पूरव-सामंत यांना भेटण्याची संधी मिळाली. त्यांचे कार्य पाहून मी भारावून गेलो. गरीब, गरजू महिला आणि त्यांच्या कुटुंबांचे सक्षमीकरण हे उद्दिष्ट घेऊन वंचित, कष्टकरी महिलांना आर्थिक पाठबळ देणारा अन्नपूर्णा परिवार पुणे आणि मुंबई येथे १९९३ पासून अविरत कार्यरत आहे. अन्नपूर्णा परिवाराने गेली एकतीस वर्षे विनातारण कर्ज व इतर बचत योजना राबवून महिलांच्या आयुष्यात आमूलाग्र बदल घडवण्याचे काम केले आहे. अन्नपूर्णा महिला को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीची पुणे, मुंबई, ठाणे अशा महाराष्ट्रातील विविध शहरांत कार्यालये आहेत. आज सुमारे सतराशे पन्नास वस्त्यांमध्ये त्या काम करत आहेत. या कामातून अनेक छोट्या-छोट्या उद्योजिका तयार झाल्या आहेत. ज्या झोपडपट्टी भागातील महिलांसाठी त्यांनी लघुवित्त पुरवठ्याचे काम केले, त्या सर्व महिला अशिक्षित होत्या. मी सुशिक्षित कुटुंबात जन्मल्यामुळे मला शिक्षणाची संधी मिळाली. तसेच कुटुंबाची आर्थिक परिस्थितीही सुस्थितीत होती. या सर्व 'बॉर्न गिफ्टेड' गोष्टींमुळे मी हे काम करू शकले, असे त्यांनी प्रांजळपणे कबूल केले. ज्या महिलांसाठी त्या काम करत होत्या त्या अशिक्षित, मागास आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल होत्या. त्यांनाही अशी संधी मिळाली असती तर त्यांनीही माझ्याप्रमाणेच काम केले असते, असे त्या म्हणाल्या. त्यांना मिळालेल्या बॉर्न गिफ्टेड गोष्टींचा त्यांनी जनकल्याणासाठी केलेला उपयोग समाजाला प्रेरणा देणारा आहे. तसेच आकाशाला गवसणी घालणारे उत्तुंग यश मिळवूनही त्यांचे पाय जमिनीवरच आहेत, हे त्यांच्या मांडणीतून स्पष्टपणे जाणवत होते. बॉर्न गिफ्ट म्हणजे जन्मजात मिळणारे फायदेसंपत्ती, शारीरिक क्षमता, तसेच अनुवंशिकरीत्या मिळणारी भावनिक व मानसिक वैशिष्ट्ये. यामध्ये भौतिक संपत्तीला विशेष महत्त्व असते. राजवंशात जन्मलेल्या मुलाला पूर्वी वंशपरंपरेने राजपद मिळायचे. तो लायक नसला तरी जनतेला त्याला सहन करावे लागायचे. त्याच्या चुकीच्या नीतीचा, मनमानीचा आणि अन्यायकारक व्यवस्थेचा परिणाम जनतेला हालअपेष्टा सहन करत आयुष्य जगण्यात होत असे. आज मात्र लोकशाही व्यवस्था आहे. राजा का बेटा राजा नहीं बनेगा, जिसकी योग्यता होगी वही राजा बनेगा! ही रीत प्रस्थापित झाली आहे. हीच खऱ्या अर्थाने न्यायपूर्ण आणि सर्वमान्य व्यवस्था आहे. भारतीय समाज हजारो वर्षे वर्णव्यवस्था या अन्यायकारक व्यवस्थेमुळे ग्रासलेला होता. व्यक्तीला मिळणारा ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य किंवा शूद्र हा वर्ण जन्मजात ठरलेला असायचा. या व्यवस्थेमुळे शूद्र जातींना हालाखीचे जीवन जगावे लागायचे. उच्च वर्णनात जन्माला येणे ही बॉर्न गिफ्ट होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, वर्णव्यवस्था ही जिना नसलेल्या इमारतीसारखी आहे. त्या इमारतीत प्रत्येक मजला म्हणजे एक वर्ण आहे; पण त्या मजल्यांवरून वर किंवा खाली जाण्यासाठी जिना नाही. आणि वरच्या मजल्यावर जन्मलेला मनुष्य कितीही अयोग्य असला तरी खाली येत नाही. शूद्राकडे कितीही लढण्याची नेपुण्यता असली किंवा तो कितीही पराक्रमी असला, तरी त्याला क्षत्रिय होऊन लढता येत नव्हते. तसेच वैश्याला कितीही चांगल्या पद्धतीने कर्मकांड करता येत असले तरी त्याला ब्राह्मण होता येत नव्हते. आज मात्र ही व्यवस्था मोठ्या प्रमाणात ढासळली आहे. आपल्याला मिळणारी शारीरिक संपदा ही सुद्धा एक प्रकारची बॉर्न गिफ्ट असते. जन्मजात काही आजार किंवा शारीरिक कमतरता आपल्याला आई-वडिलांकडून मिळू शकतात. त्याच वेळी काहींना उंची, मजबूत शरीरयष्टी आई-वडील किंवा आजी-आजोबांकडून बॉर्न गिफ्ट स्वरूपात मिळते. कोणत्याही रोगाला सहजासहजी बळी न पडणारी मजबूत शरीरसंपदाही काहींना बॉर्न गिफ्ट म्हणून मिळते. मनोधैर्य,भावनिक कणखरपणा, धाडसी वृत्ती,कठोर निर्णय क्षमता यासारखे स्वभाव वैशिष्ट्ये देखील काहींना बॉर्न गिफ्ट म्हणून मिळतात. ज्याचा जीवनात यशस्वी होण्यासाठी फार मोठा हातभार लाभतो. बॉर्न गिफ्ट व्यक्ती इतरांपेक्षा चार पावले पुढे असतात. परंतु ज्यांनी आपले विश्व शून्यातून निर्माण केले, त्यांचा संघर्ष इतिहास ठरतो. आपल्याला मिळणारी प्रत्येक बॉर्न गिफ्टेड गोष्ट सत्कर्मी लावण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे.

**- किशोर जाधव**

# भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करा !

चाकण शहरात पुणे नाशिक महामार्गावरील आंबेठाण चौकाजवळ शोभा वाघमारे या महिलेवर भटक्या कुत्र्यांनी जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात त्या महिलेचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेचा व्हिडिओही व्हायरल होत आहे. या महिलेवर भटक्या कुत्र्यांनी इतका जबरदस्त हल्ला केला की महिलेला बचावाची संधी देखील मिळाली नाही. भटक्या कुत्र्यांनी या महिलेचे अक्षरशः लचके तोडले. या या घटनेने संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ माजली असून भटक्या कुत्र्यांची समस्या पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे. अर्थात भटक्या कुत्र्यांचा हल्ल्यात जीव गमावलेल्या या पहिल्या व्यक्ती नाहीत. तीन वर्षापूर्वी बाघ बकरी चहा कंपनीचे संचालक पराग देसाई यांचाही भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाला होता. पराग देसाई यांच्या मृत्यूनंतर भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रशासनातर्फे ठोस पावले उचलण्यात येतील अशी अपेक्षा होती मात्र ही अपेक्षा फोल ठरली कारण भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी प्रशासनातर्फे कोणतेही ठोस पावले उचलण्यात आले नाहीत. उलट भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढतच चालला आहे. भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात मृत्यू झालेले पराग देसाई आणि शोभा वाघमारे हे दोघेच नसून याआधीही अशा अनेक घटना आपल्या देशात घडल्या आहेत आणि त्यात काहींचा जीवही गेला आहे. भटक्या कुत्र्यांचा हल्ल्यात जखमी होणाऱ्यांची संख्या तर अगणित आहे. भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात दररोज सहा हजारांहून अधिक लोक जखमी होतात अशी सरकारी आकडेवारीच आहे. दररोज सहा हजारांहून अधिक लोक जर भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी होत असेल तर ती मोठी गंभीर बाब आहे. केवळ शहरातच नाही देशातील गावागावात भटक्या कुत्र्यांची मोठी दहशत आहे. गाव असो वा शहर, चाळ असो



वा सोसायटी, पायवाट असो वा महामार्ग, चौक असो वा नाका सर्वत्र तुम्हाला भटक्या कुत्र्यांच्या झुंडीच्या झुंडी उभ्या असलेल्या दिसतील. हे भटके कुत्रे रस्त्यांवरून जाणाऱ्या लोकांवर अचानक हल्ला करतात. विशेषतः शाळकरी मुले , वृध्द, अपंग व महिलांना भटके कुत्रे टार्गेट करतात. दबा धरून बसलेले भटके कुत्रे अचानक घेराव घालून हल्ला करतात. भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात लोक अक्षरशः रक्तबंबाळ होतात. भटक्या कुत्र्यांच्या चावण्याने रेबीज नावाचा रोग होतो या रोगावर जर वेळीच उपचार केला नाही तर रोगी दगावण्याची देखील शक्यता असते मात्र अनेक सरकारी रुग्णालयात रेबीज वरील लसच उपलब्ध नसते. ग्रामीण भागात तर हे नेहमीचेच चित्र आहे. भटक्या कुत्र्यांची दहशत केवळ रस्त्यांवरून जाणाऱ्या लोकानांच आहे असे नाही तर पाळीव प्राण्यांना देखील आहे. शेळी, मेंढी, कोंबड्या यासारख्या पाळीव प्राण्यांवर देखील भटकी कुत्री हल्ले करतात. भटक्या कुत्र्यांच्या झुंडी अचानक येऊन पाळीव प्राण्यांचा फडशा पाडतात. भटक्या कुत्र्यांचा त्रास वाहन चालकांना देखील होतो विशेषतः दुचाकी स्वारांना भटक्या कुत्र्यांची मोठी दहशत आहे. रस्त्यांवर दुचाकी दिसली की भटके कुत्रे वाहनांच्या मागे धावतात, वाहनांना आडवे येतात त्यामुळे बऱ्याचदा अपघात होतो आणि त्या अपघातात वाहन चालक जखमी होतात त्यामुळे भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करा अशी मागणी सर्व सामान्य नागरिकांकडून होत असते मात्र त्यावर प्रशासन गंभीर नसते. खूपच मागणी झाली किंवा प्रसार माध्यमातून आवाज उठवला तर दिखाव्यासाठी कारवाई केली जाते. भटक्या कुत्र्यांचे निर्बिजिकरण नियमित केले जाते असे प्रशासनामार्फत सांगितले जाते मात्र वस्तुस्थिती वेगळीच आहे. जर भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण नियमित केले जाते तर मग देशातील भटक्या कुत्र्यांची संख्या का वाढत आहे असा प्रश्न आहे. एकट्या मुंबई शहराचे उदाहरण घेऊ. २०१४ साली मुंबईत ९५ हजार भटकी कुत्री होती आज त्यांची संख्या १ लाख ६४ हजार इतकी आहे याचाच अर्थ मागील बारा वर्षात मुंबईतील भटक्या कुत्र्यांची संख्या ७२ टक्क्यांनी वाढली. जर भटक्या कुत्र्यांची संख्या अशीच वाढत राहिली आणि त्यांचे नागरिकांवर होणारे हल्ले देखील वाढत राहिले तर भविष्यात मानव विरुद्ध भटकी कुत्री असा संघर्ष निर्माण होऊ शकतो तो होऊ द्यायचा नसेल तर शासन, प्रशासनाने भटक्या कुत्र्यांची संख्या कमी करण्यासाठी ठोस उपाय योजायला हवेत. केवळ निर्बिजीकरण केल्याने भटक्या कुत्र्यांची संख्या कमी होणार नाही हे सिद्ध झाले आहे.

प्राणीमित्र संघटनांनीही या प्रश्नाकडे मानवतेच्या दृष्टिकोनातून पाहायला हवे. भटक्या कुत्र्यांना सहानुभूती दाखवताना त्यांच्या हल्ल्यात जखमी होणाऱ्या नागरिकांकडे देखील सहानुभूतीने पाहायला हवे. आपल्या देशात २००१ साली प्राणी कल्याण कायदा लागू झाला या कायद्यानुसार भटक्या कुत्र्यांना संरक्षण मिळाले. भटक्या कुत्र्यांना ते आहेत त्या ठिकणापासून कोणीही हलवू शकत नाही शिवाय त्यांना त्याच ठिकाणी खायला घालणे अनिवार्य करण्यात आले. या कायद्यामुळे भटक्या कुत्र्यांना तर संरक्षण मिळाले पण नागरिकांना भटक्या कुत्र्यांपासून होणारा उपद्रव वाढला. भविष्यात हा उपद्रव आणखी वाढणार आहे . म्हणूनच या कायद्याचा मान राखून नागरिकांना भटक्या कुत्र्यांपासून होणारा उपद्रव कसा रोखता येईल यासाठी कोणता मध्यममार्ग काढता येईल यासाठी सरकारने एक समिती नेमावी. प्राणीमित्र संघटनेच्या सदस्यांसह, तज्ज्ञांचा समावेश या समितीत करावा. या समितीने योग्य मार्ग काढून भटक्या कुत्र्यांना संरक्षण देऊन त्यांच्यापासून नागरिकांना होणारा उपद्रव थांबवावा.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# महावितरणने केलेल्या विविध उपाययोजनांमुळे पुढील ५ वर्षांत विजेचे दर कमी होतील - मुख्यमंत्री

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१७, मुंबई :** महाराष्ट्र महावितरण कंपनीने १ लाख कोटी रुपयांचा वर्षाचा महसूलाचा टप्पा पार करून देशातील सर्वात मोठी कंपनी होण्याचा मान मिळवला आहे. सौर ऊर्जेच्या वाढत्या वापरामुळे आता राज्यातील उद्योगांना, 'सोलर अवर्स'मध्ये (सकाळी ९ ते ५) वीज वापरल्यास २५ टक्क्यांपर्यंत सवलत मिळणार आहे. महावितरणने केलेल्या उपाययोजनांमुळे पुढील पाच वर्षांत विजेचे दर वाढण्याऐवजी दरवर्षी १.२ टक्क्यांनी कमी होतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. आमदार चेतन तुपे यांनी सौर ऊर्जेचा लाभ कमी झाल्यामुळे वीज देयकात वाढ होत असल्याबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नाला मुख्यमंत्री उत्तर देत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पूर्वी रात्री १२ ते ६ या वेळेत वीज वापरासाठी सवलत दिली जात असे, कारण तेव्हा वीज शिल्लक असायची. मात्र, आता सौर ऊर्जेमुळे दिवसा (सकाळी ९ ते ५) विजेची उपलब्धता प्रचंड वाढली आहे. त्यामुळे राज्य शासनाने धोरण बदलून दिवसा वीज वापरणाऱ्यांना २५ टक्के सवलत देण्याचा निर्णय



घेतला आहे. याचा मोठा फायदा उद्योगांना होणार आहे. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने (एमइआरसी) वीज खरेदीच्या अंदाजात आणि भांडवली खर्चात काही तांत्रिक चुका केल्या होत्या.

यामुळे महावितरणचे सुमारे ८०,००० कोटी रुपयांचे एनर्जी चार्जेस आणि ५५,००० कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधांचा खर्च नाकारला गेला असता. राज्य शासनाने या चुका आयोगाच्या निदर्शनास आणून दिल्या, ज्यामुळे कंपनीचे मोठे नुकसान टळले आणि ग्राहकांवरील संभाव्य दरवाढीचा भार कमी झाला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात औद्योगिक वीज दरात कपात करण्यात आली आहे. सध्या महाराष्ट्रात औद्योगिक विजेचा दर ८.३२ रुपये प्रति युनिट आहे. २०२९-३० पर्यंत हा दर कमी होऊन ७.३८ रुपये इतका होईल. तमिळनाडू (९.३५ रुपये) आणि गुजरात (८.४३ रुपये) या राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राचा वीज दर स्पर्धात्मक आणि येत्या काळात देशात सर्वात स्वस्त असेल. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने सुरुवातीला कृषी ग्राहकांचे दर ३० टक्क्यांनी वाढवले होते, तर औद्योगिक दर कमी दाखवले होते. सरकारने या विसंगतीवर आक्षेप घेतल्यावर आयोगाने 'सुमोटो' अंतर्गत जुनी ऑर्डर मागे घेऊन ती सुधारली आहे. यामुळे शेतकऱ्यांवरील वाढीव वीज दराचा भार कमी झाला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कॅप्टिव्ह सौर ऊर्जा निर्मिती करणाऱ्यांनी जर 'बॅटरी स्टोरेज सिस्टिम'चा वापर केला, तर त्यांना २४ तास सवलतीच्या दरात वीज उपलब्ध होऊ शकते. बॅटरी स्टोरेजचे दर आता २.८० ते २.९० रुपयांपर्यंत खाली आले असून, उद्योगांनी या तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना' आणि पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली जात आहे. गेल्या तीन वर्षांत औद्योगिक विजेची मागणी २३ टक्क्यांनी वाढली आहे, जे राज्यात उद्योग मोठ्या प्रमाणावर येत असल्याचे निदर्शक आहे, असेही त्यांनी नमूद केले.

# एकविरा देवीच्या पालखी सोहळ्याचा मान यंदा ठाणे जिल्ह्यातून कल्याणच्या कोळीवाड्याला

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१७, कल्याण (ठाणे) :** लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या लोणावळा येथील कार्ला गडावर आई एकविरा देवीच्या चैत्र पालखी सोहळ्याची तयारी उत्साहात सुरू आहे. यंदाच्या वर्षी पालखी सोहळ्याचा हा मान ठाणे जिल्ह्यातून कल्याणच्या कोळीवाड्याला मिळाल्याने परिसरातील आगरी कोळी बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरवर्षी चैत्र महिन्यातील सप्तमीला आई एकविरा देवीचा भव्य असा पालखी सोहळा निघतो. ज्यामध्ये महाराष्ट्रासह देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक भक्तिभावूर्ण वातावरणात सहभागी होतात. तर एकविरा देवीची पालखी आणि या पालखी सोहळ्याचा मान मिळण्याला आगरी कोळी समाजामध्ये मोठे महत्व आहे.

यंदा एकविरा देवीचा हा पालखी सोहळा २५ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ७:०० वाजता होणार असून त्याचा मान कल्याण कोळीवाड्याला मिळाल्याने कल्याणच्या आगरी कोळी बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. कल्याण कोळीवाड्याकडून आई एकवीरा देवीच्या डोंगरावरती ही मिरवणूक निघणार आहे. आई एकविरा




देवीच्या चार मानाच्या पालख्या असतात आणि ठाणे जिल्ह्यातून एकमेव कल्याण कोळीवाड्याला पालखीचा मान मिळतो.

### कल्याणच्या कोळी - आगरी समाजाचे ऐतिहासिक महत्त्व

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या आणि इतिहासात महत्त्वाचे स्थान असलेल्या कल्याण शहराचा उल्लेख प्राचीन काळापासून आढळतो. स्वराज्याच्या आरमाराची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांनी इ.स. १६५७ साली कल्याण बंदरातून केली होती. दुर्गाडी किल्ला आणि कल्याण बंदराची निर्मिती स्थानिक कोळी-आगरी समाजाच्या सहकार्याने झाल्याची ऐतिहासिक नोंद आहे.

कल्याण कोळीवाडा हा दुर्गाडी किल्ल्याच्या पायथ्याशी वसलेला असून या कोळी-आगरी समाजाची कुलदेवता आई एकवीरा माऊली ही रेणुका मातेचा अवतार मानली जाते. दरवर्षी चैत्र महिन्यातील चैत्र सप्तमीला आई एकवीरा माऊलीचा भव्य पालखी सोहळा पार पडतो. अनेक वर्षांपासून कल्याण कोळीवाड्यातील कोळी बांधवांना या पालखी सोहळ्याचा मान मिळत असून ही परंपरा अखंडपणे सुरू आहे. यंदाही हा सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यासाठी कल्याणच्या कोळीवाड्यातील कोळीबांधव सज्ज झाले आहेत.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## कुंडलवाडीत रमजाननिमित्त भव्य इफ्तार पार्टी

### नागरिकांच्या उपस्थितीत हिंदू - मुस्लिम ऐक्याचा संदेश



अक्षराज : दत्ता हमंद

दि.१७, कुंडलवाडी (नांदेड) : रमजानच्या पवित्र महिन्याच्या निमित्ताने येथील के रामलू मंगल कार्यालय येथे मुस्लिम बांधवांसाठी भव्य इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय जनता पार्टीच्या नगराध्यक्षा प्रेरणाताई गजानन कोटलावार यांच्या पुढाकाराने व नियोजनाखाली हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. रमजान महिन्याचे धार्मिक व सामाजिक महत्त्व लक्षात घेऊन आयोजित करण्यात आलेल्या या इफ्तार कार्यक्रमात शहरातील सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. या कार्यक्रमातून समाजात बंधुभाव, एकोपा आणि परस्पर स्नेह वृद्धिंगत व्हावा तसेच हिंदू - मुस्लिम ऐक्याचा संदेश अधिक दृढ व्हावा, हा उद्देश व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमा दरम्यान उपस्थित मान्यवरांनी रमजान महिन्याच्या शुभेच्छा देत सामाजिक सलोखा, शांतता आणि परस्पर सहकार्य यांचे महत्त्व अधोरेखित केले. विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच शहरातील प्रतिष्ठित नागरिक एकत्र येऊन इफ्तारमध्ये सहभागी झाले. त्यामुळे कार्यक्रमाला सर्वपक्षीय व सर्वसमावेशक स्वरूप प्राप्त झाले. या प्रसंगी गजानन कोटलावार, सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे, विद्युत अभियंता सुरेश गट्टूवार तसेच प्रतिष्ठित व्यक्ती तथा नगरसेवक राजेश्वर उत्तरवार, नगरसेवक प्रदीप खेळगे, संजय खुळगे, गंगाधर कोटलावार, मारोती कोटलावार, संजय भास्कर, भीम पोतनकर, सोनू सब्बनवार, शेख मुखत्यार, शेख नसीर, अजय गट्टूवार सर्व नगरसेवक, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव आणि इतर समाजबांधव उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी एकत्रितपणे इफ्तार करत परस्परांना रमजानच्या शुभेच्छा दिल्या. सामाजिक सलोखा आणि ऐक्याचा संदेश देणारा हा कार्यक्रम कुंडलवाडी शहरात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## पारंपरिक खेळांचे पुनरुज्जीवन काळाची गरज - डॉ.व्यंकटेश वांगवाड



अक्षराज : सुरेश संकपाळ

दि.१७, पाटण (सातारा) : येथील कोयना एज्युकेशन सोसायटीच्या बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये 'भारतीय पारंपारिक खेळ आणि शारीरिक शिक्षणातील मनोरंजक उपक्रम' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन उत्साहात पार पडले. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, श्री.रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स (मल्टी-स्टेट) गडहिंग्लज आणि वरिष्ठ महाविद्यालयीन शारीरिक शिक्षण शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रभारी प्राचार्य प्रा. (डॉ). व्ही. ए. कळंत्रे यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी चर्चासत्राच्या आयोजनामागची भूमिका स्पष्ट करत पाहुण्यांचे स्वागत केले. चर्चासत्राचे उद्घाटन प्राचार्य डॉ. व्यंकटेश वांगवाड यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना डॉ. वांगवाड यांनी पारंपारिक खेळ आणि मानवी आरोग्य यांच्यातील अतूट नात्यावर प्रकाश टाकला. टेनिस व्हॉलीबॉल खेळाचे जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डॉ. वांगवाड यांनी आधुनिक काळात मैदानी खेळांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच पारंपारिक खेळ आरोग्याची गुरुकिल्ली आहे असे मत व्यक्त केले

उद्घाटन सत्राचे अध्यक्ष कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळांचे महत्त्व किती मोठे आहे, यावर सविस्तर चर्चा केली. भारतीय पारंपारिक खेळ शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक चपळता, सांघिक भावना आणि सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. कबड्डी, खो-खो, लंगडी यांसारखे खेळ सहजरित्या खेळले जातात, जे तणाव कमी करतात ज्याची आज विद्यार्थ्यांना आवश्यकता आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. बीजभाषण डॉ.सिंकु कुमार सिंग, नांदेड यांनी केले. प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. प्रशांत पाटील, डॉ.महेंद्र कदम-पाटील डॉ.सॅम ब्रॅगेन्झ, आय. क्यू.ए.सी. समन्वयक प्रा. डॉ. हेमलता काटे उपस्थित होते. चर्चासत्राचे आभार प्रदर्शन प्रा.डॉ. दीपक पाटील - डांगे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत केले. तर सूत्रसंचालन डॉ.शीनिवास पवार व प्रा.कु.माथने यांनी केले. सदर चर्चासत्रासाठी जवळपास २६० प्राध्यापकांनी नाव नोंदणी केली होती. या दोन दिवसीय परिषदेत विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक, संशोधक आणि खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

## नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांची पावसाळ्यापूर्वी नाले साफसफाईची मागणी



अक्षराज : विनोद वास्कर

दि.१७, पडले (ठाणे) : ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.२९ मधील भोलेनाथ नगर, ग्रीन पार्क, शिळफाटा, ठाकूरपाडा, कल्याण फाटा, पडलेगाव, खिडकाळी, देसाई, दोस्ती, खार्डीगाव, फडकेपाडा, साबेगाव, साळवी नगर परिसरातील नाले व गटारांची नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांनी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत पाहणी केली.

पाहणी केल्यानंतर असे दिसून आले की, अनेक नाले व गटार प्लास्टिकच्या बॉटल व पिशव्यानी भरलेले आहेत. ज्यामुळे पावसाळ्यातील पाण्यामुळे गटाराचे पाणी नागरिकांच्या घरात शिरण्याची शक्यता आहे. तसेच भारत गियर ते शिळफाटा दरवर्षी पावसाचे पाणी साचून वाहतूक बंद होते. ज्याचा त्रास नोकरदार वर्ग व विद्यार्थ्यांना सहन करावा लागतो. त्यामुळे भाजपा नगरसेविका वेदिका पाटील यांनी ठाणे महानगरपालिकेचे उपायुक्त श्री.बोडके यांची भेट घेऊन मोठे गटार व नाले आधुनिक पद्धतीने व ज्या ठिकाणी यंत्र सामुग्री पोहचत नसेल त्या ठिकाणी डीपक्लिनिंग करून तत्काळ साफसफाई करून गाळ काढण्याची मागणी केली.

# ८६४ लाभार्थ्यांना हक्काच्या घरांच्या चाव्या सुपूर्द हा सुवर्णक्षण - उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार



अक्षराज : प्रतिनिधी

दि.१७, मुंबई : जवळजवळ चार दशकांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर आज पहिल्या टप्प्यातील ८६४ लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काच्या घरांच्या चाव्या सुपूर्द करण्याचा हा सुवर्णक्षण आपल्याला अनुभवता येत आहे. ही घरं म्हणजे केवळ इमारत किंवा सिमेंट-विटांचं बांधकाम नाही, तर ते आपल्या स्वप्नांचं, आशा-आकांक्षांचं प्रतिक असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी सांगितले. १९२० च्या सुमारास उभारण्यात आलेल्या या ब्रिटिशकालीन बीडीडी चाळी मुंबईच्या सर्वांगीण विकासाच्या, इतिहासाच्या साक्षीदार ठरल्या आहेत. मात्र, या चाळींचा इतिहास हा केवळ इमारतींचा इतिहास नाही; तर तो इथं राहणाऱ्या कष्टकरी आणि सर्वसामान्य कुटुंबांच्या संघर्ष, जिद्द आणि एकात्मतेचा इतिहास आहे.

गेली जवळपास चार दशके येथील रहिवासी अधिक सुरक्षित, सुसज्ज आणि सन्मानाने जगता येईल अशा घराच्या प्रतीक्षेत होते. आज या दीर्घ संघर्षाला यश मिळालं असून, बीडीडीवासीयांच्या आयुष्यात एका नव्या पर्वाची सुरुवात होत असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी सांगितले.

या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सभापती प्रा.राम शिंदे, अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, कौशल्य, रोजगार उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, सांस्कृतिक कार्यमंत्री तथा पालकमंत्री मुंबई उपनगर जिल्हा ॲड आशिष शेलार, गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, महापौर रितू तावडे, आमदार चित्रा वाघ, कालिदास कळमकर, मनीषा कायंदे, सिद्धिविनायक न्यायाचे अध्यक्ष सदा सरवणकर, गृहनिर्माण विभागाचे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता तसेच लोकप्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी केले तर आभार प्रदर्शन मुख्य अधिकारी मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास महामंडळचे मिलिंद बोरीकर यांनी मानले.

# राज्याच्या लालपरीचा कायापालट होणार

## एसटीच्या तब्बल २२ हजार बस पूर्णतः बदलणार



अक्षराज : संजय पंडित

दि.१७, मुंबई : ग्रामीण महाराष्ट्राची लाईफलाइन मानली जाणारी लालपरी आता मोठ्या बदलाच्या दिशेने वाटचाल करत आहे. राज्य परिवहन महामंडळाच्या म्हणजेच एसटीच्या सर्व बस येत्या काही वर्षांत पर्यावरणपूरक होणार आहेत. २०३७ पर्यंत एसटीच्या ताफ्यातील सर्व २२ हजार बस पूर्णपणे इलेक्ट्रिक करण्याचे उद्दिष्ट राज्य सरकारने ठेवले आहे.

राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विधान परिषदेत ही महत्त्वाची माहिती दिली. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या माहितीनुसार, सध्या एसटी महामंडळाच्या ताफ्यात एकूण २२ हजार बस आहेत आणि त्यापैकी सुमारे ८०० बस इलेक्ट्रिक आहेत. उर्वरित सर्व बस टप्प्याटप्प्याने इलेक्ट्रिकमध्ये रूपांतरित करण्यात येणार आहेत, त्यामुळे महाराष्ट्रातील सरकारी बस सेवा पूर्णपणे इलेक्ट्रिक करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरू शकते.

याआधी सरकारची योजना पुढील ५ वर्षांत दरवर्षी ५ हजार डिझेल बस खरेदी करण्याची होती. मात्र पर्यावरणपूरक वाहतुकीवर भर देत सरकारने आता धोरणात बदल केला आहे. सध्या सुरू असलेल्या ८ हजार डिझेल बसेसच्या खरेदी पलीकडे भविष्यातील सर्व बस इलेक्ट्रिक असतील, यावर सरकारचा भर असणार आहे. तसेच सध्या वापरात असलेल्या डिझेल बसेसचेही इलेक्ट्रिक वाहनांमध्ये रूपांतर करण्याची योजना तयार करण्यात आली आहे.

या मोठ्या प्रकल्पासाठी राज्यभरात चार्जिंग सुविधाही उभारल्या जाणार आहेत. विशेष म्हणजे चार्जिंग स्टेशनसाठी सौर उर्जेचा वापर करण्याचा प्रस्ताव सरकारने तयार केला आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक ऊर्जा वापर वाढेल आणि पारंपरिक वीज ग्रिडवरील अवलंबित्वही कमी होईल. दरम्यान, इलेक्ट्रिक वाहन राज्याला आर्थिक फायदाही होणार आहे. कर सवलत आणि टोल माफीमुळे मोठी बचत होणार आहे.

सध्या इलेक्ट्रिक वाहनांना मुंबई पुणे एक्सप्रेस वे, नागपूर समृद्धी महामार्ग आणि अटल सेतू या प्रमुख मार्गांवर टोलमाफी देण्यात येणार आहे. तसेच राज्य सरकार महामार्गांवर दर २५ किलोमीटर अंतरावर चार्जिंग स्टेशन उभारण्याची योजना राबवणार आहे. त्यासाठी आवश्यक असलेल्या चार्जिंग तंत्रज्ञानाच्या अभ्यासक्रमांनाही प्रोत्साहन दिले जात आहे. दरम्यान, देशात २०४७ पर्यंत पूर्णपणे इलेक्ट्रिक मोबिलिटीचे स्वप्न साकार करण्याचा संकल्प पंतप्रधान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडला आहे, तर राज्यातही या दिशेने पावले उचलली जात आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली २०३७ पर्यंत एसटीचा ताफा १०० टक्के इलेक्ट्रिक करण्याचे सरकारचे ध्येय असल्याचेही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले आहे.

# साखळी खुर्द येथे 'जल अर्पण दिवस' उत्साहात साजरा

## पाऊस पाणी संकलनावर भर देण्याचे गटविकास अधिकारी डॉ.अमिता पवार यांचे आवाहन



अक्षराज : प्रतिनिधी

दि.१७, बुलढाणा : जल जीवन मिशन अंतर्गत पूर्ण झालेल्या पाणीपुरवठा योजनांचे संचलन आणि जबाबदारी आता लोकसहभागातून यशस्वी करण्यासाठी देशभर 'जल उत्सव' साजरा होत आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून बुलढाणा तालुक्यातील साखळी खुर्द येथे आज अत्यंत उत्साहात 'जल अर्पण दिवस' साजरा करण्यात आला. भविष्यातील पाण्याची टंचाई लक्षात घेता प्रत्येकाने पाऊस पाणी संकलनावर भर द्यावा, असे आवाहन पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी डॉ.अमिता पवार यांनी यावेळी केले.

दिनांक ८ ते २२ मार्च दरम्यान देशभर जल जीवन मिशन योजनेअंतर्गत जल उत्सव साजरा करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज बुलढाणा तालुक्यातील साखळी खुर्द येथे जल अर्पण दिवस साजरा करण्यात आला. यावेळी साखळी खुर्दचे सरपंच पंडित बळीराम हिवाळे यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडला. ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागाचे उपअभियंता नितेश घुसळकर यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे पाणीपुरवठा योजनेचे अधिकृत हस्तांतरण करणे हे होते. आता गावातील पाणीपुरवठा प्रणालीचे नेतृत्व ग्रामपंचायत आणि ग्राम आरोग्य पोषण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती करणार आहे. डॉ.पवार यांनी आपल्या मार्गदर्शनात स्पष्ट केले की, या योजना म्हणजे समुदाय आणि सरकार यांच्यातील भागीदारीचे प्रतीक आहेत. त्यामुळे ग्रामस्थांनी त्याचे 'पालकत्व' स्वीकारणे गरजेचे आहे.

'जल अर्पण दिवसा'निमित्त गावात विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये पाण्याचे आणि नळ योजनेचे विधीवत पूजन करण्यात आले. त्यानंतर शालेय विद्यार्थ्यांनी पाण्यावर आधारित भारुड, गाणी आणि नृत्याद्वारे प्रबोधन केले. विद्यार्थ्यांनी गावातून फेरी काढून जल बचतीचा संदेश दिला. उपस्थितांनी पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी आणि भविष्यासाठी जलसाक्षर होण्यासाठी सामुहिक 'जल प्रतिज्ञा' घेतली. उपअभियंता नितेश घुसळकर यांनी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जल अर्पण दिवसाचे महत्त्व विषद केले. तसेच मनीषा शेजव यांनी पाणीपुरवठा समितीचे कार्य आणि पाऊस पाणी संकल्पनेबाबत माहिती दिली. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाचे संदीप सुखधान यांनी जल प्रतिज्ञा वाचन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शाखा अभियंता शुभम बारोटे यांनी केले. या सोहळ्यासाठी उपसरपंच, माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, महिला बचत गट, शिक्षक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आंबेसरी उपकेंद्रातील वैद्यकीय अधिकारी लाच प्रकरणात जेरबंद

## ३५ हजारांची लाच स्वीकारताना एसीबीची कारवाई; डहाणू तालुक्यात खळबळ



अक्षराज : निलेश कासट

दि.१७, डहाणू (पालघर) : डहाणू तालुक्यातील गंजाड अंतर्गत उपकेंद्र आंबेसरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील भरारी वैद्यकीय अधिकारी डॉ.विजय माणिक सांगळे (वय ४१) यांना ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांनी रंगेहात पकडले. या कारवाईमुळे आरोग्य विभागात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणातील तक्रारदार संदीप बाबू दळवी (वय ४०, व्यवसाय चालक, रा.गणेशबाग, गंजाड) यांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार व त्यांच्या दोन मित्रांच्या इको गाड्या गंजाड अंतर्गत नागझरी, जामशेत व आंबेसरी उपकेंद्रांमध्ये भाडे तत्वावर कार्यरत होत्या. या गाड्यांचे बिल मंजूर करून देण्यासाठी डॉ. सांगळे दरमहा सुमारे १० हजार रुपये घेत असल्याचा आरोप आहे.

मार्च २०२५ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत सहा महिन्यांची बिले मंजूर झाल्यानंतर संबंधित बिलांचा मोबदला म्हणून डॉ. सांगळे यांनी प्रत्येकी ३० हजार रुपये तसेच ५ हजार रुपये डिपॉझिट अशी एकूण ३५ हजार रुपये लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. तिघांकडून एकूण १ लाख ५ हजार रुपये मागणी करण्यात आली होती. लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने १७ मार्च २०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर येथे तक्रार दाखल केली. त्यानुसार करण्यात आलेल्या पडताळणीत लाचेची मागणी स्पष्ट झाल्यानंतर एसीबीने सापळा रचला. त्याच दिवशी दुपारी आशागड चौकाकडून जामशेतकडे जाणाऱ्या रस्त्यावरील निळसर टपरीजवळ पंचासमक्ष सापळा कारवाई करण्यात आली. यावेळी डॉ. विजय सांगळे यांना तक्रारदाराकडून ३५ हजार रुपये स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले. या प्रकरणी डहाणू पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ (सुधारित २०१८) कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास पोलीस निरीक्षक राकेश डांगे करत आहेत. ही कारवाई पोलीस उपअधीक्षक दादाराम करांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहवा नवनाथ भगत, विलास भोये, योगेश धारणे, आकाश लोहारे, प्रकाश दळवी, जितेंद्र गवळे, गीता कहार यांच्या पथकाने केली. दरम्यान, भ्रष्टाचाराविरोधात नागरिकांनी पुढे येऊन तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांनी केले आहे.

# ५ व्या फेडरेशन कप कबड्डी स्पर्धेकरिता महाराष्ट्राचे संघ जाहीर

## आकाश शिंदे, समरीन बुरोंडकर यांच्याकडे महाराष्ट्राचे नेतृत्व

**अक्षराज : संदीप येवले**

**दि.१७, मुंबई :** महाराष्ट्र राज्य कबड्डी असो. ने ५व्या वरिष्ठ गट कबड्डी स्पर्धेकरिता आपले दोन्ही संघ जाहीर केले. संता, मध्य प्रदेश येथे दि.१९ ते २२ मार्च २०२६ या कालावधित ही स्पर्धा खेळविण्यात येईल. नाशिकच्या आकाश शिंदे कडे पुरुष संघाचे, तर रत्नागिरीच्या सिमरन बुरोंडकर कडे महिला संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपविण्यात आली.

या दोन्ही संघाना स्पर्धेकरिता शुभेच्छा देण्याचा कार्यक्रम दिनांक १६ मार्च २०२६ रोजी डोंबिवली येथे आयोजित करण्यात आला होता. निवडण्यात आलेला हा संघ आज दि.१७ मार्च रोजी दुपारी ०१.३० वा. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून स्पर्धेकरिता रवाना झाला.अशी माहिती व संघाची घोषणा राज्य कबड्डी संघटनेचे सचिव माधव गायकवाड यांनी सर्व प्रसार माध्यमाकरिता केली.





**निवडण्यात आलेला संघ खालील प्रमाणे :-**

**पुरुष संघ** :- १) आकाश शिंदे- संघनायक, नाशिक, २)सुरज दूंदले - ठाणे, ३) आकाश अरसूल - मुं. उपनगर, ४) सौरभ राऊत - अ. नगर, ५) संकेत सावंत - मुंबई शहर, ६) सुरेश जाधव - पुणे, ७) साईप्रसाद पाटील - कोल्हापूर, ८) अजित चौहान - पुणे, ९) आदित्य शशिकांत शिंदे - रत्नागिरी, १०)आदित्य पोवार - कोल्हापूर, ११) अनुज गावडे - पुणे, १२)सौरभ फागरे - कोल्हापूर, १३) साहिल राणे - मुंबई शहर, १४) अभिषेक गुंगे - सांगली.

**प्रशिक्षक** :- निलेश शिंदे, मुंबई उपनगर

**व्यवस्थापक** :- भगीरथ पाटील, ठाणे.महिला संघ :- १) समरीन बुरोंडकर, संघनायिका - रत्नागिरी, २) माधुरी गवंडी - ठाणे, ३) कोमल देवकर - मुंबई उपनगर, ४)तसनिम बुरोंडकर - रत्नागिरी, ५) शुभदा खोत -मुंबई उपनगर, ६) आम्रपाली गलांडे - पुणे, ७) प्रतिक्षा तांडेल - मुंबई शहर, ८) हर्षा शेट्टी - पुणे, ९) याशिका पुजारी -मुंबई उपनगर, १०) समृद्धी मोहिते -मुंबई उपनगर, ११) निकिता पडवळ - पुणे, १२) प्रणाली नागदेवता -मुंबई उपनगर, १३) संजना भोईर -पालघर, १४) साक्षी सावंत - मुंबई शहर.

**प्रशिक्षिका** :- मेघाली म्हसकर

**व्यवस्थापिका** :- अश्विनी ईश्वलकर.

# सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्यांना पत्नीसह वर्षभर मोफत प्रवास - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१७, मुंबई :** एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी विधानभवन येथे महत्वपूर्ण बैठक घेतली. या बैठकीत कर्मचारी संघटनांनी मांडलेल्या तक्रारी व मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

त्या टप्प्याटप्प्याने मार्गी लावण्यासाठी प्रशासनाला आवश्यक निर्देश देण्यात आले. तसेच एसटीच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना यापुढे पत्नीसह वर्षभर मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली.एसटी महामंडळात कार्यरत असलेल्या सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघाने चालक-वाहकांवरील कारवाई, आगार व्यवस्थापनातील अडचणी तसेच काही प्रशासकीय प्रक्रियांमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांकडे मंत्री सरनाईक यांचे लक्ष वेधले होते.



या पार्श्वभूमीवर संघाचे अध्यक्ष आमदार सदाभाऊ खोत तसेच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत मंत्री सरनाईक यांनी सकारात्मक चर्चा केली. कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा हीच महामंडळाची भूमिका असल्याचे यावेळी सांगितले. ३ वर्षांपेक्षा जास्त काळ एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या पर्यवेक्षक व अधिकाऱ्यांच्या बदल्यामंत्री सरनाईक यांनी एकाच ठिकाणी ३ वर्षांपेक्षा अधिक काळ सेवा बजावणाऱ्या पर्यवेक्षक व अधिकाऱ्यांची इतर ठिकाणी बदली करण्याचे निर्देश एसटी प्रशासनाला दिले.

या संदर्भात कर्मचारी संघटनांच्या भावना तीव्र असून, या प्रक्रियेची अंमलबजावणी तातडीने करण्याच्या सूचना ही दिल्या.सामान्य प्रवाशांना उत्तम सेवा देणे हेच एसटीचे तसेच सर्व कर्मचाऱ्यांचे अंतिम उद्दिष्ट आहे. त्यामुळे काम करताना चालक-वाहकांना भेडसावणाऱ्या दैनंदिन अडचणी, आगार स्तरावरील निर्णयप्रक्रिया तसेच शिस्तभंग कारवाईच्या बाबतीत न्याय्य व पारदर्शक पद्धतीने काम करण्याचे निर्देश मंत्री सरनाईक यांनी यावेळी दिले.मंत्री सरनाईक म्हणाले की, कर्मचारी संघटनांशी नियमित संवाद साधून त्यांच्या समस्या सोडविण्याबाबत एस.टी. प्रशासन सकारात्मक आहे.

कर्मचाऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर शक्य तितक्या लवकर कार्यवाही करण्याची महामंडळाची भूमिका आहे, जेणेकरून सामान्य प्रवाशांना अधिक चांगली सेवा देणे शक्य होईल. त्यामुळे एसटी व्यवस्थापनाने कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा विचार करून सामोपचाराने तोडगा काढावा, असे निर्देश त्यांनी दिले. या बैठकीस एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर तसेच सर्व खातेप्रमुख उपस्थित होते.

# विंचूर जवळील कृष्णवाडी येथे १९ मार्च रोजी १२ व्या 'अग्निहोम उत्सवा'चे आयोजन

## शाहीर किसन पिठे यांचा 'नाथ भक्तीपर गायना'चा कार्यक्रम ठरणार मुख्य आकर्षण

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१७, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यातील विंचूर पासून जवळच असलेल्या कृष्णवाडी (सालकाडे वस्ती) येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी चैत्र शुद्ध प्रतिपदा, म्हणजेच गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर, गुरुवार, दि.१९ मार्च २०२६ रोजी १२ व्या 'अग्निहोम कार्यक्रम उत्सवा'चे भव्य आयोजन करण्यात येणार आहे.

धार्मिक वारसा आणि प्रेरणाहा सोहळा वैकुंठवासी गुरुवर्य शंकरबाबा कांडेककर (निमगाव) आणि वैकुंठवासी गुरुवर्य शंकरबाबा पवार (विठ्ठलवाडी) यांच्या आशीर्वादाने संपन्न होत आहे. तसेच, नाथभक्त गुरुमाऊली श्री. रामनाथ बाबा कांडेककर (निमगाव) आणि नाथभक्त श्री. रामदासबाबा मोरे (कृष्णवाडी) यांच्या प्रेरणेतून या धार्मिक कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येणार आहे.दिवसभराचे धार्मिक कार्यक्रम उत्सवानिमित्त सायंकाळपासून विविध धार्मिक विधी पार पडणार आहेत.

**कार्यक्रमाचे स्वरूप खालीलप्रमाणे :-**

सायंकाळी ६:०० वाजता धुप, आरती व नैवेद्य. सायंकाळी ७:०० वाजता: महाप्रसाद. रात्री ९:०० ते १२:००: मुख्य 'अग्निहोम विधी' व लाही प्रसाद वाटप व नाथभक्तीपर गायनाचा कार्यक्रम.

**विशेष आकर्षण** :- नाथभक्तीपर गायनया सोहळ्याचे खास आकर्षण म्हणजे शाहीर किसन पिठे (चापडगांवकर) यांचा रात्री ९ ते १२ या वेळेत रंगणारा 'नाथभक्तीपर गायनाचा' कार्यक्रम. आपल्या सुश्राव्य वाणीतून ते नाथभक्तीचा महिमा आणि संतांचे विचार भाविकांसमोर सादर करणार आहेत.



उपस्थितीचे आवाहन. या मंगलमयी सोहळ्याचे आयोजन सर्व नाथभक्त परिवार व जय मल्हार भक्त परिवार, कृष्णवाडी (विंचूर पंचक्रोशी) यांच्या वतीने करण्याचे नियोजन झाले आहे. तरी परिसरातील सर्व भाविक भक्तांनी या अग्निहोम कार्यक्रमाचा आणि महाप्रसादाचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# राज्यभर भाजी मार्केटवर युद्धाचं सावट; शेतकरी आर्थिक कोंडीत

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१७, ठाणे :** आखाती देशातील युद्धाची झळ आता थेट ठाण्यातील भाजी बाजाराला बसू लागली आहे. आखाती देशांमध्ये होणारी शेतमालाची निर्यात पूर्णत: ठप्प झाल्याचे पाहायला मिळत आहे.या परिस्थितीमुळे राज्यातील बळीराजा अक्षरशा आर्थिक कोंडीत सापडला आहे. ठाण्यातील भाजी बाजाराला देखील या युद्धाचा फटका बसल्याने मार्केटमध्येकाकडी, दुधी, कारल्याचा साठा खप कमी झाल्याने वाढू लागला आहे. तसेच युद्धामुळे भाजीपाला - फळांचे दर घसरले आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावरील युद्ध स्थितीचा परिणाम आता स्थानिक बाजारपेठांवर ही दिसून येऊ लागला आहे. ठाण्यातील जांभळी नाका येथील मुख्य भाजी बाजारात याचे स्पष्ट परिणाम जाणवत असून काही भाज्यांच्या दरांमध्ये लक्षणीय घसरण झाली आहे. निर्यातीसाठी जाणारा भाजीपाल्याचा माल सध्या मोठ्या प्रमाणात थांबला असल्याने काकडी, दुधी भोपळा, कारली यांसारख्या भाज्यांचा साठा स्थानिक बाजारात वाढला आहे. परिणामी या भाज्यांचे दर साधारण १० ते १५ रुपयांनी कमी झाले आहेत.बाजारात पुरवठा वाढल्यामुळे व्यापाऱ्यांना अपेक्षित दर मिळत नसल्याचे चित्र दिसत आहे. निर्यात थांबल्यामुळे व्यापाऱ्यांबरोबरच शेतकऱ्यांनाही आर्थिक फटका बसत आहे. निर्यातीसाठी पिकवलेला माल स्थानिक बाजारातच विकावा लागत असल्याने त्यांना कमी दरात व्यवहार करावे लागत आहेत. त्यामुळे भाजीपाला उत्पादक शेतकरी आणि व्यापारी दोघेही सध्या चिंतेत असल्याचे बाजारातील चित्र आहे.

### भाज्यांची निर्यात सुरू न झाल्यास भाज्यांचे दर आणखी घसरणार

भाजी विक्रेत्यांच्या मते, निर्यात पुन्हा सुरू झाली नाही तर पुढील काही दिवसांत दर आणखी घसरण्याची शक्यता आहे. बाजारात मालाचा साठा वाढत असल्याने विक्री कमी दरात करावी लागत आहे. त्यामुळे अनेक व्यापाऱ्यांनी नव्याने माल खरेदी करताना सावध भूमिका घेतली असून, साठा कमी करण्यावर भर दिला जात आहे. दरम्यान, परिस्थिती लवकर सुधारेल आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठ पुन्हा खुली होईल, अशी अपेक्षा शेतकरी आणि व्यापारी व्यक्त करत आहेत. अन्यथा भाजीपाल्याच्या दरातील ही घसरण कायम राहिल्यास उत्पादकांना मोठा आर्थिक फटका बसण्याची भीती ही व्यक्त केली जात आहे.दरम्यान इराण-इस्रायल युद्धाची झळ आता थेट ठाण्यातील भाजी बाजाराला बसू लागली आहे. आखाती देशांना होणारी कच्च्या मालाची निर्यात पूर्णपणे थांबल्यामुळे, निर्यातीसाठी असलेला माल स्थानिक कृषी उत्पादन बाजारात पडून आहे. यामुळे बाजारात भाजीपाल्याची आवक प्रचंड वाढली असून, भावातही लक्षणीय घट झाली आहे. मात्र, दुसरीकडे, वाढत्या भावांमुळे विक्रेते चिंतेत आहेत, कारण ग्राहक घराबाहेर पडणे टाळत आहेत. व्यापाऱ्यांच्या मते, केवळ निर्यातबंदीमुळेच नाही, तर व्यावसायिक गॅसच्या तुटवड्यामुळे हॉटेल उद्योगालाही फटका बसत आहे. हॉटेल्समध्ये भाजीपाल्याच्या पदार्थांचा वापर कमी झाल्यामुळे विक्रीत मोठी घट नोंदवली गेली आहे. यामुळे शेतकरी आणि व्यापारी या दोघांनाही दुहेरी फटका बसला आहे.

# थोडक्यात

## पाणी फाऊंडेशन तर्फे तालुक्यातील सत्यमेव जयते फार्मर कप २०२६ साठी ६२ प्रशिक्षणार्थी सहभागी

**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.१७, चिमूर (चंद्रपूर) :** पाणी फाऊंडेशन तर्फे चिमूर तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी 'सत्यमेव जयते फार्मर कप २०२६' अंतर्गत ६२ प्रशिक्षणार्थी प्रथम बॅचचे तीन दिवसीय प्रशिक्षण दिनांक १६ ते १८ मार्च २०२६ नई तालीम सेवाग्राम जिल्हा वर्धा येथे उत्साहात सुरू आहे. या प्रशिक्षणात चिमूर तालुक्यातील शेतकरी पुरुष - महिला तसेच उमेद अशा ६२ प्रशिक्षणार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. प्रशिक्षणामध्ये शेती क्षेत्रातील सत्यमेव जयते फार्मर कप २०२६ स्पर्धा, गटशेती चळवळ तसेच विषमुक्त शेती या विषयांवर पाणी फाऊंडेशनच्या प्रशिक्षण पथकाने अत्यंत खेळीमेळीच्या व सहभागात्मक पद्धतीने मार्गदर्शन करणे सुरू आहे. या प्रशिक्षणात पाणी फाऊंडेशनचे फिल्ड अधिकारी अभिजीत गोडसे, कृषी विभागांचे नोडल अधिकारीज भावना खाडे, उमेद विभागाच्या क्षेत्रीय अधिकारी दिपाली बोडके व प्रशिक्षक टिम प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करीत आहेत.



## ठाण्याचे योगतज्ज्ञ डॉ. कुंभार यांचा आंतरराष्ट्रीय स्तरावर सन्मान

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, ठाणे :** येथील डीएव्ही पब्लिक स्कूलचे योग शिक्षक आणि योगतज्ज्ञ डॉ. अजय कुंभार यांना स्वामी विवेकानंद सांस्कृतिक केंद्र आणि श्रीलंकेतील भारतीय उच्चायोगाकडून विशेष प्रशंसापत्राने सन्मानित करण्यात आले आहे.



श्रीलंकेतील नागरिकांसाठी ऑनलाईन पद्धतीने सन २०२० पासून आयोजित ऑनलाईन योग सत्रांमध्ये डॉ. कुंभार सलगपणे योगदान देत आहेत. त्याबद्दल त्यांचा हा सन्मान करण्यात आला आहे. डॉ. कुंभार यांनी आतापर्यंत नियमित, संरचित आणि शिस्तबद्ध योग कार्यक्रम द्वारे योग, आरोग्य, मानसिक संतुलन आणि भारतीय सांस्कृतिक मूल्यांना प्रोत्साहन देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यांच्या सेवांमुळे श्रीलंकेत भारतीय संस्कृती आणि योगाची ओळख केवळ मजबूत झाली नाही तर जागतिक स्तरावर भारताचा हा बहुमोल वारसा स्थापित झाला आहे. 'वसुधैव कुटुंबकम' या भावनेला मूर्त रूप दिले आहे. डॉ. कुंभार यांनी योग विषयातच पदव्युत्तर पदवी प्राप्त केली असून, पीएचडीच्या माध्यमातून योगातच त्यांनी संशोधन केले आहे. स्वामी विवेकानंद सांस्कृतिक केंद्रातर्फे त्यांचा झालेला सन्मान हा त्यांच्या योगातील योगदाचा गौरव आहे.

## एसटी महामंडळाचा तोटा कमी करण्यासाठी विशेष प्रयत्न - परिवहन मंत्री सरनाईक

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१७, मुंबई :** राज्यातील सर्वसामान्य प्रवासी नागरिकांना महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ मार्फत दर्जेदार प्रवासी सेवा देण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात असून एसटी महामंडळाचा तोटा कमी करण्यासाठी विशेष उपक्रम, योजना राबविण्यास प्राधान्य दिले जात असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधान परिषदेत सांगितले. विधान परिषदेत सदस्य अभिजित वंजारी यांनी म.वि.प. नियम ९२ अन्वये उपस्थित केलेल्या अर्धा तास चर्चेला उत्तर देताना मंत्री सरनाईक बोलत होते. या चर्चेत सदस्य शशिकांत शिंदे, ज्ञानेश्वर म्हात्रे, जयंत असगावकर, निरंजन डावखरे यांनी सहभाग घेतला.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, राज्याच्या दुर्गम भागापर्यंत प्रवाशांना सेवा देण्यासाठी एसटी महामंडळ सदैव कार्यरत आहे. ही प्रवासी सेवा सध्या महामंडळाकडे असलेल्या १४ हजारांहून अधिक बसगाड्यांद्वारे दिली जाते. या सेवेला अधिक सक्षम करण्यासाठी महामंडळाने मोठ्या प्रमाणावर नवीन बसगाड्या खरेदी करण्याचा निर्णय घेतला असून ८ हजार ३०० नवीन बसगाड्या एसटी महामंडळाच्या ताफ्यात दाखल होणार आहेत. यातील ३ हजार बस गाड्यांचे लोकार्पण करण्यात येणार आहे. या बसगाड्या राज्यातील सर्व डेपोमध्ये टप्प्याटप्प्याने पाठविण्यात येणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

मंत्री सरनाईक म्हणाले, नवीन बसगाड्यांची सेवा सुरू करण्यासाठी १७ हजार ७४२ पदांची चालक-वाहकांची भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात केवळ कंत्राटी पद्धतीने कर्मचारी नियुक्त करण्यात येणार आहे. परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले, एसटी महामंडळाचे उत्पन्न वाढविण्यासाठी विविध उपाय योजना करण्यात येत आहेत. यामध्ये डिझेल खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविल्याने पूर्वी मिळणाऱ्या सवलतीपेक्षा अधिक म्हणजे प्रति लिटर ५.१३ रुपये इतकी सवलत मिळाली आहे. जाहिरातींसाठी नव्या निविदा प्रक्रियेमुळे महामंडळाचे वार्षिक उत्पन्न वाढणार आहे. काही बसस्थानकांच्या जागांवर व्यावसायिक उपक्रम, तसेच वीज खर्च कमी करण्यासाठी सौरऊर्जेचा वापर करून महामंडळाचे उत्पन्न वाढणार असल्याचे ते म्हणाले. ग्रामीण व दुर्गम भागांमध्ये सेवा वाढविण्यासाठी मिडी आणि लहान बसगाड्यांचा घेण्याचा निर्णय घेतला असून गाव तिथे एसटी ही संकल्पना अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी सांगितले.

## सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही दुय्यम निबंधक कार्यालये राहणार सुरू

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, हिंगोली :** आर्थिक वर्ष संपत येत असल्याने तसेच नववर्षाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांचा मालमत्ता खरेदीकडे कल वाढण्याची शक्यता आहे. परिणामी दस्त नोंदणीचे प्रमाण वाढण्याची शक्यता लक्षात घेता तसेच इष्टांक पूर्ततेच्या दृष्टीने दि. २६ मार्च २०२६, दि. २८ मार्च २०२६, दि. २९ मार्च २०२६ व दि. ३१ मार्च २०२६ या चार सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी ही जिल्ह्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालये सुरू ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आदेशानुसार सुट्टीच्या दिवशी सुरू असलेल्या दुय्यम निबंधक कार्यालयांवर नियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी तसेच अभिनिर्णय, कमी पडलेले मुद्रांक शुल्क आदी कामे विहित वेळेत पूर्ण करण्यासाठी सह जिल्हा निबंधक वर्ग-१ यांनाही कार्यरत ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.